आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

९ डिसेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महायुती सरकारवरचा विश्वासदर्शक ठराव विधानसभेत आवाजी मतदानानं मंजूर /२०२३-२४ या वर्षात राज्यात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक आल्याचं राज्यपालांचं अभिभाषणात प्रतिपादन

- विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड

- गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब

- रिझर्व्ह बँकेचे पुढचे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांची नियुक्ती

**आणि**

- राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांमधे राज्याला ६ पुरस्कार जाहीर

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा विश्वासदर्शक ठराव आज विधानसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाला. विधानसभा सदस्य उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, संजय कुटे आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमडळावर विश्वास दर्शवणारा ठराव सभागृहात मांडला होता, तो सभागृहाने आवाजी मतदानानं मंजूर केला.

दरम्यान, विधानसभेच्या अध्यक्षपदाची निवडणूक बिनविरोध झाली असली तरी आता विरोधी पक्षाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते म्हणाले…

**होल्ड बाईट - विजय वडेट्टीवार**

**<><><><><>**

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीला संबोधित केलं. महाराष्ट्र उद्योगात अग्रेसर असून २०२३-२४ साली राज्यात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक आल्याचं राज्यपालांनी यावेळी सांगितलं. गेल्या आठ महिन्यात तीन लाख कोटींहून अधिक गुंतवणूक झाली असून यामुळे एक लाख १८ हजार रोजगार निर्माण होणार आहेत असं राज्यपाल म्हणाले. सरकारने अनेक उद्योग राज्यात उभारले असून राज्याला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्याचं ध्येय असल्याचं राज्यापालांनी सांगितलं. यावेळी राज्यपालांनी सरकारने राबवलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा उल्लेख केला.

**<><><><><>**

बेळगावच्या मराठी बांधवांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध राज्य सरकार एकमतानं आणि सर्व शक्तीनिशी सीमाभागातल्या बांधवांच्या पाठीशी उभं आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली. राज्यघटनेनं दिलेल्या अधिकारांचं उल्लंघन केल्याचा आरोप कर्नाटक सरकारवर करून या प्रकरणाचा निकाल सर्वोच्च न्यायालयात लागेपर्यंत धडा सुरूच ठेवणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची आज बिनविरोध निवड झाली. हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अध्यक्षपदासाठी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता, त्यांच्याविरोधात अन्य कोणीही उमेदवार नसल्याने हा प्रस्ताव सभागृहाने आवाजी मतदानानं मंजूर केला.

त्यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही उप-मुख्यमंत्र्यांनी तसंच जयंत पाटील आणि नाना पटोले यांनी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. नार्वेकर यांची ओळख विद्वान आणि संयमी अशी असून राज्याच्या इतिहासात सलग दोनदा पद भुषवणारे ते चौथे व्यक्ती आहेत, असं देवेंद्र फडनवीस यांनी त्यांच्या भाषणात सांगितलं. आधीच्या कार्यकाळात अध्यक्षांनी ज्याप्रकारे निःपक्षपातीपणे कामकाज चालवलं तीच परंपरा पुढे सुरू राहील असंही फडनवीस म्हणाले.

त्याआधी सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी जयंत पाटील, विनय कोरे, सुनील शेळके आणि उत्तम जानकर यांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सभागृहाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा परिचय करून दिला.

<><><><><>

महाराष्ट्र हे असिमित ताकदीचं राज्य आहे. आता आपण क्रमांक एक वर आहोत, म्हणून थांबू नका, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी राज्याच्या सचिवस्तरीय अधिकाऱ्यांना आज सांगितलं. त्यांनी आज विधान भवनातल्या समिती सभागृहात या अधिकाऱ्यांची विशेष आढावा बैठक घेतली. केंद्र सरकारच्या सहकार्याचा राज्याच्या प्रगतीसाठी पुरेपूर वापर

करून घेण्यासाठी अधिक समन्वय, पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा, असं ते म्हणाले.

पायाभूत सुविधांप्रमाणेच राज्यातल्या, केंद्र आणि राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजनांसाठीही स्वतंत्र वॉररूम सुरु करण्याचे त्यांनी निर्देश यावेळी दिले. त्यातून सर्वसामान्य लोकांपर्यंत लाभ गतीनं पोहोचवण्यासाठी जनता दरबार, लोकशाही दिन कार्यक्रम वेगानं हाती घ्यावेत, आपले सरकार पोर्टल पूर्ण क्षमतेनं चालवावं, जिल्ह्यांच्या पालक सचिवांनी आपआपल्या जिल्ह्यांचे तातडीनं दौरे सुरु करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. राज्य शासनाची सर्व संकेतस्थळ आरटीआय फ्रेंडली करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. नागरिकांना सुविधा देण्यासाठी तसंच, प्रशासकीय कामांसाठी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याची सूचना त्यांनी दिली. त्यासाठी प्रत्येक विभागानं शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणासह विविध मुद्द्यांवरून आजही संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेत काँग्रेस, द्रमुकसह अन्य विरोधी पक्ष सदस्यांनी अदानी लाचखोरी  प्रकरणात घोषणाबाजी केली. या दरम्यान, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे सुधारणा विधेयक २०२४ वरच्या चर्चेला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांना कामकाज सुरू ठेवण्याची विनंती केली. मात्र तरीही गोंधळ सुरूच राहिल्याने लोकसभेचं कामकाज आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेत भाजपा नेते जे. पी. नड्डा यांनी काँग्रेसवर राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणल्याचा आणि देशात अस्थिरता असल्याची अफवा पसरवल्याचा आरोप केला. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचे अमेरिकेतल्या जॉर्ज सोरोस फाऊंडेशनशी संबंध असल्याचा आरोपही त्यांनी केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या आरोपांचं खंडन केलं आणि भाजपा देशद्रोही असल्याचा प्रत्यारोप केला. त्यामुळे गदारोळ झाल्यानं राज्यसभेचं कामकाजही दिवसभरासाठी तहकूब झालं.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेचे पुढचे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांची नियुक्ती केंद्र सरकारनं केली आहे. सध्याचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ उद्या संपणार आहे. त्यानंतर ११ डिसेंबरला संजय मल्होत्रा पदभार स्वीकारतील. त्यांना तीन वर्षांचा कार्यकाळ मिळेल. १९९०च्या राजस्थान कॅडरचे भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी असलेले संजय मल्होत्रा सध्या अर्थमंत्रालयात महसूल सचिव पदावर काम करत आहेत.

<><><><><>

केंद्रीय पंचायत राज मंत्रालयानं 2022-23 या वर्षाकरता राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांसाठी देशभरातून विविध श्रेणींमध्ये 45 पुरस्कार विजेत्यांची निवड जाहीर केली आहे. त्यात राज्याला 6 पुरस्कार मिळाले आहेत.

यामध्ये सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीनं नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार

श्रेणीत सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम उर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरलं.

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत स्वच्छ आणि हरित ग्राम पंचायत हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे

भंडारा जिल्ह्यातल्या बेला ग्रामपंचायतीनं कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.

तर पुण्यातल्या यशदा, अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या संस्थेला पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था श्रेणीत तृतीय क्रमांचाचा पुरस्कार मिळाला आहे. येत्या बुधवारी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान केले जातील.

<><><><><>

मुंबईतल्या प्रा. एल.एन. वेलिंगकर व्यवस्थापन विकास आणि संशोधन संस्थेमध्ये येत्या ११ आणि १२ डिसेंबर २०२४ रोजी 'स्मार्ट इंडिया हॅकथॉन' या राष्ट्रीय स्तरावरील महाअंतिम फेरीचं आयोजन केलं आहे. शिक्षण मंत्रालय आणि भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधानमंत्री कार्यालयानं हा कार्यक्रम आयोजित केला आहे. या वर्षीच्या हॅकाथॉनमध्ये ५४ मंत्रालये, विविध केंद्रीय विभाग आणि उद्योगांनी सादर केलेल्या २५० हून अधिक समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी राष्ट्र

प्रेमाला महत्व देण्यात आलं आहे. पुण्यामध्ये राष्ट्रीय स्मार्ट इंडिया हॅकेथॉन-२०२४ स्पर्धेच्या हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीची सुरूवातही येत्या ११ डिसेंबरला एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात होणार आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई तालुक्यातल्या येल्डा इथं ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी तयार केलेल्या हंगामी वसतिगृहात काल रात्री ३७ विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाली. त्यांना स्वाराती रूग्णालयात दाखल करुन तात्काळ उपचार करून निगराणीखाली ठेवलं आहे. सध्या सर्व विद्यार्थ्यांची सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यातल्या अंकलखोप इथले ज्येष्ठ लोककलावंत शाहीर आनंदराव सूर्यवंशी यांचं काल संध्याकाळी निधन झालं. ते १०१ वर्षांचे होते. आकाशवाणीच्या  सांगली केंद्राचे ते अनेक वर्षे मान्यताप्राप्त कलाकार होते. राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे त्यांनी लोककला सादर केल्या होत्या. जिल्हा नशाबंदी संघटक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना शासनाने व्यसनमुक्ती पुरस्कार दिला होता.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकणात, तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर कोकणात लक्षणीय घट झाली. राज्यात

सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं ९ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

//<><><><><>//